**पोलीस अधीक्षक कार्यालय, पालघर.**
जिल्हा मुख्यालय, कोळगाव, पालघर
दुरध्वनी – ०२५२५ - २५११००
E-mail: - sp.palghar@mahapolice.gmail.com

**प्रेसनोट क्र. २२ दिनांक २३/०२/२०२५**

# नकली नोटांची अदलाबदल करणाऱ्या टोळीला वाडा पोलीसांकडुन अटक

दिनांक २२/०२/२०२५ रोजी वाडा पोलीस ठाण्याचे पोलीसांना गुप्त बातमीदारामार्फत माहीती मिळाली की, पाली गावच्या हद्दीत काही इसम भारतीय चलनातील खऱ्या नोटा व खऱ्या नोटांप्रमाणेच दिसणाऱ्या नकली नोटा एकत्रीत करुन त्या चलनात आणण्यासाठी व अदलाबदल करण्यासाठी एकत्र येणार आहेत. अशी खात्रीशिर माहीती मिळाल्याने पोलीस पथकाने पाली नाका येथे सापळा रचला. जिल्हा परिषद शाळा पालीच्या मेन गेट जवळ एक इसम अंदाजे ३० ते ३५ वर्ष वयोगटाचा लाल रंगाचा टि-शर्ट व चॉकलेटी रंगाची जिन्स घालेली हातात काळया रंगाची लगेज बॅग घेवुन संशयास्पद हालचाली करतांना दिसला. त्याच्यावर पाळत ठेवुन पोलीस पथक दबा धरुन बसलेले असतांना दुपारी ३:४५ वाजेच्या सुमारांस विक्रमगड बाजुकडुन आलेली सिल्वर रंगाची इरटीगा कार क्रमांक **M.H.04 JM.3135** हि जि.प.शाळा पालीच्या गेट जवळ येवुन थांबली. त्या कारमधुन दोन इसम खाली उतरले व हातात काळया रंगाची लगेज बॅग असलेल्या इसमाकडे चालत गेले. तिनही इसम एकमेकांशी चर्चा करत असतांना पोलीस पथकातील अधिकारी अंमलदार व यांनी सदर इसमांवर झडप घालुन त्यांना ताब्यात घेतले व त्यांची झडती घेतली असता, त्यांच्याकडे १०० रुपये दराच्या नोटांचे ४ बंडल, एका बंडलमध्ये १७ बंडल असे तर ५०० रुपये दराच्या नोटांचे १ बंडल त्या बंडलमध्ये ५०० रुपये दराच्या नोटांचे १६ बंडल असे प्लास्टीकच्या पारदर्शक आवरणाने व रबर बॅंडच्या सहायाने पॅक केलेल्या मिळुन आल्या. तसेच नोटांच्या आकाराचे काळया रंगाचे पुठ्ठयांचे दोन बंडल, पारदर्शक प्लास्टीकच्या पिशव्यांचे दोन बंडल व नोटांचे बंडल तयार करणेसाठी वापरात असलेल्या पारदर्शक चिकट पट्टया असा मुद्देमाल मिळुन आला. तर इर्टीगा गाडीमधुन आलेल्या दोन इसमांकडे ५०० रुपये दराच्या नोटांचे २ बंडल भारतीय चलानातील खऱ्या नोटा असे एक लाख रुपये मिळुन आले. लाल टि-शर्ट व जिन्स पॅन्ट घातलेल्या इसमाच्या ताब्यात असलेल्या नोटांमध्ये ५०० रुपये व १०० रुपये दराच्या नोटांच्या बंडलमधिल वर असलेल्या व शेवटी असलेली नोटा हया खऱ्या नोटा असुन त्यांच्या खाली असलेल्या नोटा हया "भारतीय बच्चो का बैंक" अशा लिहीलेल्या भारतीय चलनातील खऱ्या नोटांप्रमाणेच दिसणाऱ्या नकली नोटा अशा १४ लाख रुपये किमतीच्या नकली नोटा मिळुन आल्या. ताब्यात घेतलेल्या इसमांकडे विचारपुस केली असता सदरच्या नोटा हया अदलाबदल करण्यासाठी वापरणार असल्याचे त्यांनी सांगीतले. ताब्यात घेतलल्या इसमांची नावे १) विकास उर्फ विकी प्रकाश पवार, वय ३२ वर्षे, रा. शिरिषपाडा, ता. वाडा, जि. पालघर, २) इम्तीयाज बशीर शेख वय ५६ वर्ष, रा.कासा बुद्रुक ता.विक्रमगड, जि.पालघर, ३) वसीम अन्वर सय्यद, वय-३६ वर्षे, रा.क-हे तलावली,

ता. विक्रमगड, जि.पालघर अशी असुन त्याबाबत वाडा पोलीस ठाणे येथे गु.रजि.नं.ा ८३/२०२५ भारतीय न्याय संहीता कलम ३१८(४), १८०, १८२, ३(५) प्रमाणे गुन्हा दाखल केलेला असुन अधिक तपास वरीष्ठांच्या मार्गदर्शनाखाली पोउपनि/सागर मालकर, नेमणुक वाडा पोलीस ठाणे हे करत आहेत.

सदरची कारवाई श्री. बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक, पालघर श्री. विनायक नरळे, अपर पोलीस अधीक्षक, पालघर, श्री. गणपत पिंगळे, उप विभागीय पोलीस अधिकारी जव्हार विभाग, यांचे मार्गदर्शानाखाली श्री. दत्तात्रय किंद्रे, पोलीस निरीक्षक,वाडा पोलीस ठाणे, पोउपनिरी/ सागर मालकर, पोउपनिरी/मयुरेश अंबाजी, पोउपनिरी/मयुर शेवाळे, पो.हवा./गुरुनाथ गोतारणे, पो.हवा./विजय मढवी, पो.ना./मनोज चौधरी, पो.शि./गजानन जाधव, पो.शि./भुषण खिल्लारे, पोशि/संतोष वाकचौरे सर्व नेमणुक वाडा पोलीस ठाणे यांनी पार पाडली आहे.